महाराष्ट्र शासन,गृह विभाग

# कार्यालय जिल्हा समादेशक,होमगार्ड,यवतमाळ

होमगार्ड प्रशिक्षण केंद्र,गुरुव्दारा जवळ, आर्णी रोड,यवतमाळ- ४४५ ००२

दु. / . ०७२३२-२९१२३० email - dchgyavatmal@yahoo.com

क्रमांक :- 350 / प्रशा–जिप्रके / 2024 दिनांक : 24/07 / 2024

प्रति,
मा. जिल्हा माहिती अधिकारी,
यवतमाळ

**विषय -होमगार्ड नोंदणी ची बातमी प्रसिध्द करणे बाबत.**

उपरोक्त विषयान्वये यवतमाळ जिल्हयातील रिक्त होमगार्ड अनुशेष पुर्ण करणे करीता होमगार्ड नोंदणीचे आयोजन करण्यात येणार आहे याची खालील प्रमाणे बातमी जिल्हयातील सर्व वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द कराची हि विनंती.

**प्रेस नोट**

यवतमाळ जिल्हा होमगार्ड मधील रिक्त असलेल्या 121 चा होमगार्ड सदस्य अनुशेष भरणे करीता होमगार्ड नोंदणीचे आयोजन दिनांक 28/08/2024 पासुन पोलीस मुख्यालय यवतमाळ येथे केले आहे. या करीता दिनांक 17/08/2024 अखेर ऑनलाईन अर्ज मागविणेत येत असुन होमगार्ड नोंदणीचे माहीती पत्रक नियम व अटी बाबत विस्तृत माहिती.

https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login1.php या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. सदर अनुशेषामध्ये बदल करण्याचा अधिकारी जिल्हा समादेशक होमगार्ड यवतमाळ यांना राहील. तरी होमगार्ड मध्ये सेवाकरू इच्छीत असलेल्या यवतमाळ जिल्हयातील रहीवासी उमेदवारांनी नोंदणी करीता अर्ज करावा असे आवाहन जिल्हा समादेशक तथा अपर पोलीस अधीक्षक श्री.पियुष जगताप (म.पो.से) यांनी केले आहे

( पियुष विलास जगताप )
जिल्हा समादेशक होमगार्ड
तथा अपर पोलीस अधिक्षक,
यवतमाळ

महाराष्ट्र शासन,गृह विभाग

# कार्यालय जिल्हा समादेशक,होमगार्ड,यवतमाळ

होमगार्ड प्रशिक्षण केंद्र,गुरुव्दारा जवळ, आर्णी रोड,यवतमाळ- ४४५ ००२

दु. . . ०७२३२-२९१२३० email - dchgyavatmal@yahoo.com

| क्रमांक :-350/प्रशा–जिप्रके/2024 | दिनांक : 24/07/2024 |
|---|---|

परिपत्रक क मस कार्या 03/1432 दिनाक 09/07/2024 चे सोबत.

## बातमी

## मानसेवी होमगार्ड सदस्य नोंदणी

यवतमाळ जिल्हयातील पथक उपपथकामधील पुरुष महिला होमगार्डची सदस्य नोंदणी दिनांक 28/08/2024 रोजी पोलीस कवायत मैदान पळसवाडी यवतमाळ या ठिकाणी सकाळी ७ वाजल्यापासून घेण्यात येणार आहे. होमगार्ड नोंदणी पात्रतेचे निकष पुढीलप्रमाणे असतील शिक्षण कमीत कमी १० वी उत्तीर्ण वय २० ते ५० वर्षे उची पुरुषाकरिता १६२ से मी व महिलाकरिता १५० से मी संबंधित उमेदवारांस विहित केलेल्या वेळेत धावणे व गोळाफेक शारिरीक चाचणी दयावी लागेल.

निवड होऊन पात्र ठरलेले उमेदवार हे वेतनी सेवेत असतील तर त्यांना वेतनी सेवेत असल्याचे कार्यालयाचे अथवा मालकाचे नाहरकत प्रमाणपत्र, पोलीस चारित्र्य पडताळणी अहवाल व सक्षम वैद्यकीय अधिका–यांचे शारिरीकदृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र, माजी सैनिक अथवा एनसीसी प्रमाणपत्रधारक व इतर अन्य तपशीलाच्या पुष्टयर्थ सर्व संबंधित प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.

होमगार्ड नोंदणीचे अर्ज दि. **26/07/2024** ते **17/08/2024** या कालावधीमध्ये https://maharashtracdhg.gov.in/mahahg/enrollmentform.php या संकेतस्थळावर फक्त इंग्रजी या भाषेमधून भरावयाचा असुन अर्ज भरताना सर्व माहिती काळजीपूर्वक भरावयाची आहे.

उमेदवारास नोंदणीचेवेळी त्यांना स्वखर्चाने यावे लागेल तसेच नोंदणीचेवेळी कोणतीही अपघाती घटना घडल्यास त्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील उमेदवारांची निवड पूर्णपणे गुणवतेवर करण्यात येईल.

(पियुष विलास जगताप)
जिल्हा समादेशक होमगार्ड
तथा अपर पोलीस अधिक्षक,
यवतमाळ

---

प्रति,
मा. जिल्हा माहिती अधिकारी
यवतमाळ. (एकुण 10 प्रति)

**विषय :- होमगार्ड नोंदणी 2024 जाहिरात प्रसिध्द करणे बाबत.**

उपरोक्त विषयानुसार सादर करण्यात येते की, वरिल प्रमाणे होमगार्ड नोंदणी संदर्भात आपल्या मार्फत आवश्यक त्या स्थानीक वृत्तपत्रात विनामुल्य बातमी प्रसिध्द करणे बाबत विनंती करण्यात येत आहे.

(पियुष विलास जगताप)
जिल्हा समादेशक होमगार्ड
तथा अपर पोलीस अधिक्षक,
यवतमाळ

**माहितीपत्रक -**

# - होमगार्ड संघटना -

उददेश :- देशातील जास्तीजास्त नागरीकांना सैनिकी, तसेच आपतकालीन मदतकार्याचे कायदा व सुव्यवस्था सुरळित राखण्याचे प्रशिक्षण देवून जबाबदार व शिस्तप्रिय नागरीक घडविणे हा होमगार्ड संघटनेचा उददेश आहे.

१. होमगार्ड सदस्यत्व - महाराष्ट्रातील होमगार्ड संघटना ही शासन संचलित पुर्णतः मानसेवी तत्वावर आधारीत आहे. या संघटनेचे सदस्य होणे म्हणजे कोणत्याही प्रकारची नोकरी अथवा रोजगार नाही. हे सदस्यत्व तीन वर्षांकरीता दिले जात असून आपण संघटनेसाठी दिलेल्या सेवेच्या गुणवत्तेवर पुढे ३-३ वर्षाच्या टप्प्याने वयाच्या ५८ वर्षापर्यंत पुर्णनोंदणीकृत करता येते..

२. होमगार्ड सदस्यांचे कर्तव्य होमगार्ड सदस्यांना दररोज कर्तव्य दिले जात नाही.

पोलीस दलाच्या मागणी प्रमाणे कायदा व सुव्यवस्था राखणे कामी पोलीस दलासोबत बंदोबस्त कर्तव्य, आपतकालीन परिस्थितीमध्ये अग्निशमन, विमोचन, पूरविमोचन तसेच रोगराई / महामारीकाळात संपकाळात प्रशासनांस मदतकार्य अशी कर्तव्ये दिली जातात.

३. होमगार्ड ना देय भत्ते होमगार्ड सदस्यांना बंदोबस्त काळात प्रतिदिन रु. ५७०/- कर्तव्य भत्ता व रु. १००/- उपहारभत्ता दिला जातो. तसेच प्रशिक्षण काळात रु. ३५/- खिसाभत्ता व रु. १००/- भोजनभत्ता व साप्ताहिक कवायतीसाठी रु. ९०/- कवायत भत्ता दिला जातो.

४. शास्ती - होमगार्ड सदस्यांना दररोज कर्तव्य दिले जात नाही परंतू अत्यावश्यक प्रसंगी बंदोबस्त कर्तव्याकरीता विनाकारण अनुपस्थित राहणा-या कर्तव्यामध्ये कसूर करणाऱ्या / आदेशांचे पालन न करणाऱ्या होमगार्ड सदस्यांवर मुंबई होमगार्ड अधिनियम १९४७ कलम ७ (१) अन्वये बडतर्फ किवा रु. २५०/- इतका दंड / तीन महीन्याची साधी कैद अशी शिक्षा करण्याची तरतूद आहे.

५. होमगार्ड नोदणी- होमगार्ड नोदणी करीता कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही. सदस्यत्व मिळणेकरीता काणत्याही इतर मार्गाचा (वशिला किंवा लाच) अवलंब करु नये. याकरीता कोणीही लाच / पैशाची मागणी केल्यास अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, यवतमाळ किंवा मा. जिल्हा समादेशक तथा अपर पोलीस अधिक्षक यवतमाळ यांचेशी संपर्क साधावा,

६. होमगार्ड सदस्यत्वाचे फायदे -

१. सैनिकी गणवेश परीधान करणेचा मान व विनाशुल्क सैनिकी प्रशिक्षण
२. ३ वर्षे सेवापूर्ण होमगार्डना राज्य पोलीस दल, वनविभाग, अग्निशमन दलामध्ये ५% आरक्षण.
३. प्रथमोपचार, अग्निशमन, विमोचन या सारख्या विषयांचे प्रशिक्षण घेण्याची संधी.
४. गौरवास्पद कामगिरी केल्यास विवीध पुरस्कार/पदके मिळविण्याची संधी,
५. स्वतःचा व्यवसाय/शेती इ. सांभाळत देशसेवा करण्याची संधी.

# होमगार्ड नोंदणी नियम व अटी

**१. होमगार्ड पात्रतेचे निकष :-**

अ) शैक्षणिक पात्रता - कमीत कमी १० वी उत्तीर्ण (SSC)

ब) शारिरीक पात्रता -

१. वय २० वर्षे पुर्ण ते ५० वर्षांच्या आत. (दि. 17/08/2024 रोजी)

२. उंची पुरुषांकरीता १६२ से. मी. महिलांकरीता १५० से. मी.

३. छाती (फक्त पुरुष उमेदवारांकरीता ) (न फुगविता किमान ७६ से.मी. कमीत कमी ५ सेमी फुगविणे आवश्यक)

**3) आवश्यक कागदपत्र -**

1. रहीवासी पुरावा आधारकार्ड, मतदान ओळखपत्र
2. शेक्षणिक अहर्ता प्रमाणपत्र
3. जन्मदिनांक पुराव्याकरीता SSC बोर्ड प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला.
4. तांत्रिक अहर्ता धारण करीता असल्यास तत्सम प्रमाणपत्र.
5. खाजगी नोकरी करीत असल्यास मालकाचे ना-हरकत प्रमाणपत्र.
6. वैद्यकीयदृष्टया पात्र असावा (शासकीय वैद्यकीय अधिका–यांचे प्रमाणपत्र)
7. पोलीस चारित्य पडताळणी अहवाल अनुकूल असावा
8. शारिरीक विकलांगता असलेले उमेदवार नोंदणीसाठी अपात्र असतील.
9. ज्या कार्यालयाच्या आस्थापनेवर कार्यरत आहे. अशा कार्यालयाने होमगार्डमध्ये नोंदणी होण्यासाठी तसेच वेळोवेळी कर्तव्य प्रशिक्षणासाठी सवलत मंजूरीचे दिलेले लेखी संमतीपत्र
10. बेरोजगार व्यक्ती होमगार्ड नोंदणीसाठी पात्र असतील
11. यापूर्वी संघटनेत असलेले परंतु गैरशिस्त अफरातफर, न्यायालयीन प्रकरणी दोषी असलेले ठरलेले व काढून टाकलेले उमेदवार नोंदणीसाठी विहित अटी पूर्ण करीत असले तरी त्यांना संघटनेत पुन्हा घेता येणार नाही

२. शारिरीक क्षमता चाचणी-

अ) धावणे

| पुरुष उमेदवार | | महीला उमेदवार | |
|---|---|---|---|
| **१६०० मी. धावणे** | **२० गुण** | **८०० मी. धावणे** | **२५ गुण** |
| ५.मि. १० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | २० गुण | २ मि. ५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | २५ गुण |
| ५मि. १० सेकंदापेक्षा जास्त परंतु ५ मि. ३० सेकंदापेक्षा कमी | १८ गुण | 2 मि. ५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३मि.०० सेकंदापेक्षा कमी | २२ गुण |
| ५मि. ३० सेकंदापेक्षा जास्त परंतु ५मि.५० सेकंदापेक्षा कमी | १६ गुण | 3 मि. ०० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३मि. १० सेकंदापेक्षा कमी | १८ गुण |
| ५मि.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ६मि. १० सेकंदापेक्षा कमी | १४ गुण | 3 मि. १० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३मि. २० सेकंदापेक्षा कमी | १४ गुण |
| ६.मि. १० सेकंदापेक्षा जास्त परंतु ६मि. ३० सेकंदापेक्षा कमी | १२ गुण | 3 मि. २० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३मि.३० सेकंदापेक्षा कमी | १० गुण |
| ६मि. ३० सेकंदापेक्षा जास्त परंतु ६मि.५० सेकंदापेक्षा कमी | १० गुण | ३मि. ३० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३मि. ४० सेकंदापेक्षा कमी | ०६ गुण |
| ६ मि.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ७मि. १० सेकंदापेक्षा कमी | ०६ गुण | ३मि. ४० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३मि. ५० सेकंदापेक्षा कमी | ०४ गुण |
| ७मि. १० सेकंदापेक्षा जास्त परंतु ७मि. ३० सेकंदापेक्षा कमी | ०२ गुण | ३मि. ५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ४मि. पेक्षा कमी | ०२ गुण |
| ७ मि. ३० सेकंदापेक्षा जास्त | ० गुण | ४ मि. ०० सेकंदापेक्षा जास्त | ० गुण |

**ब. गोळाफेक** - पुरुष उमेदवारांकरीता.

| गोळाफेकीचे अंतर मीटर मध्ये | | |
|---|---|---|
| ८.५० मीटर किंवा त्यापेक्षा जास्त | --- | १० गुण |
| ७.९० मीटर किंवा जास्त | ८.५० मीटरपेक्षा कमी | ०९ गुण |
| ७.३० मीटर किया जास्त | ७.९० मीटरपेक्षा कमी | ०८ गुण |
| ६.७० मीटर किंवा जास्त | ७.३० मीटरपेक्षा कमी | ०७ गुण |
| ६.१० मीटर किंवा जास्त | ६.७० मीटरपेक्षा कमी | ०६ गुण |
| ५.५० मोटर किंवा जास्त | ६.१० मीटरपेक्षा कमी | ०५ गुण |
| ४.९० मीटर किंवा जास्त | ५.५० मीटरपेक्षा कमी | ०४ गुण |
| ४.३० मीटर किंवा जास्त | ४.९० मीटरपेक्षा कमी | ०३ गुण |
| ३.७० मीटर किंवा जास्त | ४.३० मीटरपेक्षा कमी\ | ०२ गुण |
| ३.१० मीटर किया जास्त | ३.७० मीटरपेक्षा कमी | ०१ गुण |
| ३.१० मीटर पेक्षा कमी | --- | ०० गुण |

**क. गोळाफेक** महिला उमेदवारांकरीता.

| गोळाफेकीचे अंतर मीटर मध्ये | | |
|---|---|---|
| ६.०० मीटर किंवा त्यापेक्षा जास्त | -- | १० गुण |
| ५.५० मीटर किंवा जास्त | ६.०० मीटरपेक्षा कमी | ०८ गुण |
| ५.०० मीटर किंवा जास्त | ५.५० मीटरपेक्षा कमी | ०६ गुण |
| ४.५० मीटर किंवा जास्त | ५.०० मीटरपेक्षा कमी | ०४ गुण |
| ४.०० मीटर किंवा जास्त | ४.५० मीटरपेक्षा कमी | ०२ गुण |
| ४.०० मीटर किंवा कमी | --- | ०० गुण |

सुचना- 1.उमेदवाराला जास्तीजास्त तीन संधी दिल्या जातील व त्यातील अधितम अंतर ग्राहय धरले जाईल,
2.गोळा जर सिर्माकन रेषेच्या मध्यावर पडला तर उमेदवारांस नजीकच्या वरच्या श्रेणीतील गुण दिले जातील.

**ड. तांत्रिक अहर्ता गुण -**

| तांत्रिक अहर्ता एकूण गुण १० | अटींची पुर्तता केल्यास | गुण |
|---|---|---|
| १. आय टी आय (III) प्रमाणपत्र धारक | यापैकी १ अट पूर्ण करीत असेल तर | २ गुण |
| तर(जिल्हास्तरीय क्रिडास्पर्धामध्ये प्राविण्यप्राप्त) | यापैकी २ अट पूर्ण करीत असेल | ३ गुण |
| ३. माजी सैनिक (डिस्चार्ज कार्ड आवश्यक) | यापैकी ३ अट पूर्ण करीत असेल तर | ४ गुण |
| ४. एन.सी.सी. बी प्रमाणपत्र | यापैकी ४ अट पूर्ण करीत असेल | ५ गुण |
| ५. एन.सी.सी. सी प्रमाणपत्र | यापैकी ५ अट पूर्ण करीत असेल तर | ७ गुण |
| ६.नागरी संरक्षण सेवेत परंतु स्थानिक ठिकाणी तीन प्रशिक्षण पूर्ण केलेले प्रमाध्सपत्र धारक | यापैकी ६ अट पूर्ण करीत असेल | ८ गुण |
| ७. जड वाहनचालक परवाना धारक | सर्व अटी पुर्ण करीत असतील तर | **१० गुण** |

• **शारिरिक क्षमता चाचणी पात्र ठरल्यानंतरच तांत्रिक अर्हतांचे गुण विचारात घेतले जातील**

## नोंदणी अर्ज भरणे संदभातील सुचना

1. होमगार्ड नोंदणीचे अर्ज दि. **26/07/2024 ते 17/08/2024 या कालावधीमध्ये** https://maharashtracdhg.gov.in/mahahg/enrollmentform.php या संकेतस्थळावर फक्त इंग्रजी या भाषेमधून भरावयाचा असुन अर्ज भरताना सर्व माहिती काळजीपूर्वक भरावयाची आहे. उदा. आधारकार्ड क्रमांक, जन्मदिनांक व्यवस्थित नोंद कराव्यात. एका उमेदवाराला आधारकार्ड क्र. च्या सहाय्याने एकदाच अर्ज दाखल करता येईल.

2. उमेदवार ज्या भागातील रहीवासी आहे तो भाग ज्या पोलीस ठाणेच्या अंतर्गत येतो त्यांना त्याच पोलीस ठाणे अंतर्गत पोलीस ठाणे आणि पथकामध्ये त्याच जिल्हयात अर्ज दाखल करता येईल.

3. अर्ज **SUBMIT** केल्यावर Print Registration Form या मेनू मध्ये जावून त्याची छायांकीत प्रत काढावयाची आहे. त्यावर उमेदवारांनी भरलेला सर्व मजकूर छापून येईल. त्यावर आपला वर्तमानातील एक फोटा चिटकवावा, मराठी मधील नाव उमेदवारानी स्वतः पेनानी लिहावयाचे आहे. इतर कोणतीही माहिती उमेदवारानी भरू नये.

4. **ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि. 17/08/2024 सायं. 5 वाजेपर्यंत राहील** सर्व अर्जाची छाननी झालेनंतर कागदपत्र पडताळणी व शारिरिक क्षमता चाचणी करीता तारीख जाहीर करणेत येईल.

5. कागदपत्र पडताळणी व शारिरिक क्षमता चाचणी करीता येताना अ.क्र. १. क मध्ये दर्शविल्याप्रमाणे सर्व आवश्यक कागदपत्रांच्या उमेदवारांनी स्वतः स्वाक्षरी केलेल्या छायांकित प्रति अर्जासोबत जोडाव्यात. अर्ज नोंदणीच्या दिवशी स्वतः घेवून यावे. दोन फोटो व मुळ कागदपत्र नोंदणीच्या वेळी पडताळणीकरीता बंधनकारक राहील.

6. उमेदवारांना नोंदणीकरीता स्वःखर्चाने उपस्थित रहावे लागेल, नोंदणी दरम्यान किंवा प्रवासादरम्यान कोणतीही दुखापत झाल्यास त्याची सुपर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील.

7. पात्र उमेदवारांची अंतिम निवड पोलीस ठाणे निहाय रिक्त असलेल्या जागांनुसार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल. समान गुण प्राप्त करणाऱ्या उमेदवाराच्या बाबतीत वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारांस प्राधान्य दिले जाईल. तसेच वय समान असेल तर शैक्षणिक अहर्ता व तांत्रिक प्रमाणपत्रांच्या आधारावर निवड निश्चित करणेत येईल.

8. यापूर्वी होमगार्ड संघटनेतून अकार्यक्षम बेशिस्त ठरल्याने न्यायालयीन प्रकरणी दोषी असल्याने सेवासमाप्त केलेले होमगार्ड नोंदणीस अर्ज करणेस अपात्र ठरतील. मात्र स्वेच्छेने राजिनामा दिलेले होमगार्ड विहीत अटी पूर्ण करीत असतील तर अर्ज करणेस पात्र राहीतील

9. अंतिम गुणवत्ता यादी याच संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल.

10. पथक/पोलीस ठाणे निहाय रिक्त जागा निश्चित करण्याचे सर्व अधिकार मा. जिल्हा समादेशक यांनी राखून ठेवले आहे.

## ऑनलाईन अर्ज खालीलप्रमाणे भरावा

1. सर्व प्रथम जिल्हा Select करावा (ज्या जिल्हयात नोंदणी जाहीर झाली असेल तेच जिल्हे मेनू मध्ये उपलब्ध असतील.)
2. त्यानंतर आपण ज्या पोलीस ठाणेच्या हददी मध्ये राहता त्या विभाग ज्या होमगार्ड पथकामध्ये येतो ते पथक आणि पोलीस ठाणे Select करावे. याकरीता खालील तक्ता पहावा.

| अ.क्र. | होमगार्ड पथक/उपपथक | अंतर्गत पोलीस ठाणे |
|---|---|---|
| 1. | यवतमाळ | यवतमाळ शहर, यवतमाळ ग्रामिण, अवधुतवाडी, लोहारा, कळंब, बाभुळगाव, वडगाव जंगल |
| 2 | पुसद | पुसद शहर, पुसद ग्रामिण, महागाव, खंडाळा, दराटी, वसंतनगर, उमरखेड, पोफाळी, बिटरगाव |
| 3 | पांढरकवडा | पांढरकवडा, घाटंजी, राळेगाव, पारवा, वडकी |
| 4 | दारव्हा | दारव्हा, दिग्रस, आर्णी, नेर, लाडखेड |
| 5 | वणी | वणी, शिरपुर, पाटण, मारेगाव, मुकूटबन |

३. आपला १२ अंकी आधार क्र. काळजीपुर्वक भरावा. आधार क्र. चुकीचा भरल्यास अर्ज बाद ठरविला जाईल.

४. यानंतर लिंग, पुर्ण पत्ता, शिक्षण, व्यवसाय, इमेल आयडी, ही माहीती काळजीपुर्वक भरावी.

५. वरील जाहीरातीमध्ये दिल्याप्रमाणे ज्या प्रकारची तांत्रिक अर्हता आहेत त्यांची संख्या Select करावी. (उदा. उमेदवार जड वाहन परवानाधारक, प्राविण्यप्राप्त खेळाडू आणि NCC B प्रमाणपत्र धारक असेल तर तांत्रिक अर्हता संख्या तीन (Three) राहील)

६. जन्मदिनांक, उंची (से. मी. मध्ये) काळजीपुर्वक भरावी.

७. यापूर्वी होमगार्ड सेवेत असाल तर YES असे निवडावे. असाल तर ज्या कारणास्तव कमी करणेत आले त्या आदेशाची प्रत सोबत जोडावी.

८. अर्ज SUBMIT केल्यावर आपण सरळ PRINT करण्यासाठीच्या Page वर जाल त्याठीकाणी आपला आधार क्र. आणि जन्मदिनांक भरुन आपल्या अर्जाची पहाणी करुन अर्जाची PRINT A4 पेपरवर काढावी व नोंदणी करीता येताना आवश्यक कागदपत्रांसह सादर करावी.

**कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सर्वर कनेक्टीवीटी मिळत नसल्यास कार्यालयीन वेळ वगळून अर्ज भरावा.**